# -: प्रेस नोट :-

**कक्ष-११, गु.प्र.शा., गु.अ.वि., कांदिवली-प, मुंबई.** **दि. २०/०५/२०२२**

**<u>मोटार सायकल्स चोरी करणाऱ्या टोळीस जेरबंद करून ०५ गुन्हे उघडकीस आणलेबाबत.</u>**

सुरक्षीत पार्क केलेल्या दुचाकी मोटार सायकलवर पाळत ठेवुन संधी मिळताच बनावट चावीने सदर मोटार सायकलची चोरी करणारी एक टोळी मालवणी परीसरात कार्यरत असलेबाबत विश्वसनीय बातमी गुन्हे शाखा, कक्ष ११ चे पथकास प्राप्त झाली होती. सदर बातमीच्या आधारे दिनांक १९/०५/२०२२ रोजी कक्ष ११ येथिल पोउपनि अजित कानगुडे यांना माहिती मिळाली की, नमुद टोळीतील इसम चोरीची मोटार सायकल विकण्यासाठी लोटस तलावासमोर, मार्वे रोड, मालवणी, मालाड पश्चिम, मुंबई येथे येणार आहेत. त्या अनुशंगाने कक्ष ११ चे पथकाने सदर ठिकाणी पाळत ठेवली होती. त्याप्रमाणे पोलीस पथकाने सापळा रचुन प्राप्त माहितीनुसार तेथे आलेल्या तीन इसमांना त्यांचे ताब्यात असणारे दोन दुचाकी वाहनासह ताब्यात घेतले. पोलीस पथकाने त्यांच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी असमाधानकारक माहीती दिली. नमूद दोन्ही ॲक्टीव्हा या दुचाकी वाहनाच्या इंजीन नंबर व चेसीस नंबरवरुन त्या क्रमांकाबाबत अभिलेखावरुन माहिती घेतली असता नमूद गाडया हया चोरी झालेल्या असून त्याबाबत अनुक्रमे दिंडोशी पोलीस ठाणे येथे गु.नों.क्र. १४४/२०२२, कलम ३७९ भादवि आणि वर्सोवा पोलीस ठाणे येथे गु.नों.क्र. ०२७८/२०२२ कलम ३७९ भांदवि अन्वये गुन्हा नोंद असल्याची माहिती प्राप्त झाली.

नमुद इसमांना ताब्यात घेवून त्यांचेकडे अधिक तपास केला असता त्यांनी त्यांचे साथीदारांचे मदतीने आणखी ०३ मोटार सायकली चोरल्याची माहिती दिली त्याबाबत अधिक तपास करुन त्यांचेकडुन खालील नमुद एकूण ०५ मोटार सायकल मढ, मालवणी परिसरातून हस्तगत करण्यात आल्या आहेत.

१) ग्रे रंगाची होंडा कंपनीची ॲक्टीव्हा क्र. MH-04 KV-0962, इंजिन क्र- JF91EW0321839,
चेसिस क्र- ME4JF913FMW322397.
२) पांढऱ्या रंगाची होंडा कंपनीची ॲक्टीव्हा, क्र. MH-02 ED-6548, इंजिन क्र. JF50E82342584, चेसिस क्र. ME4JF504LF8343025.
३) लाल रंगाची होंडा कंपनीची ॲक्टीवा क्र. MH-02 CG 6123] इंजिन क्र. JC44E1356933,
चेसिस क्र. ME4JC448EB8246091-
४) ग्रे रंगाची होंडा कंपनीची ॲक्टीव्हा क्र. MH-04 GG 1546, इंजिन क्र. JF50E70302875,
चेसिस क्र- ME4JF501GD7303302.
५) ग्रे रंगाची होंडा डिओ स्कुटी क्र. MH-48 AB 8097, इंजिन क्र. JF39E7027628,
चेसिस क्र- ME4JF392AF7272612.

आरोपींकडून हस्तगत वर नमुद मोटार सायकल संबधाने आभिलेख तपासला असता हस्तगत मोटार सायकल चोरी गेल्याबाबत अनुक्रमे १) दिंडोशी पोलीस ठाणे, गु.नों.क्र. १४४/२०२२, कलम ३७९ भादवि २) वर्सोवा पोलीस ठाणे गु.नों.क्र. ०२७८/२०२२ कलम ३७९ भांदवि ३) मालवणी पोलीस ठाणे गु.नों.क्र. ८००/२०२२ कलम ३७९ भांदवि प्रमाणे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे व इतर मोटार सायकल बाबतचा अभिलेख तपासत आहोत. सदर आरोपींपैकी दोन आरोपी हे विधी संघर्षग्रस्त बालक आहेत.

**अटक आरोपींचे वर्णन**:-

१) एक २९ वर्षे वयाचा पुरुष इसम, रा.ठी. राठी- रुम नं.२०१, हेलन नगर, वेलफेअर सोसायटी, मढ जेटटी, मालाड पश्चिम, मुंबई.
२) एक १७ वर्षे वयाचा विधी संघर्षगस्त बालक.
३) एक १५ वर्षे वयाचा विधी संघर्षगस्त बालक.

सदर आरोपी व मोटार सायकल पुढील कार्यवाहीकरीता दिंडोशी पोलीस ठाणेच्या ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस सह आयुक्त श्री सुहास वारके, मा. अपर पोलीस आयुक्त श्री विरेश प्रभू, मा. पोलीस उप-आयुक्त (प्र-१) श्री. संग्रामसिंह निशाणदार, सहाय्यक पोलीस आयुक्त, (प्रकटीकरण-उत्तर) श्री. काशीनाथ चव्हाण, प्रभारी पोलीस निरीक्षक विनायक चव्हाण यांच्या मागदर्शनाखाली पो.नि. मानसिंग पाटील, पोनि भरत घोणे, स.पो.नि. अभिजीत जाधव, सपोनि विशाल पाटील, सहा. फौजदार ६३८०/शिंदे, पो.ह.क्र.३२७४०/गायकवाड, पो.ह.क्र.२९२१०/तरटे, पो.ना.क्र.०३३५२/कदम व पो.ना.क्र. ०६०६०६/ शिंदे यांनी केली आहे.

***** D-1/ 15 /2022*****

**----------00----------**